दैनिक मराठवाडा पत्र



## दैनिक मराठवाडा पत्रच्या वर्धापना दिनानिमित्त शुभेच्छा देतांना विविध स्तरातील मान्यवर








# पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा

**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरण,वातावरणीय बदल पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

दि. २५ मार्च २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आगमन व शासकीय वाहनाने परळी वैजनाथ, जि. बीड कडे रवाना.रात्री ११.४५ वाजता यशःश्री निवासस्थान, परळी वैजनाथ, जि. बीड येथे आगमन व राखीव.गुरुवार,



दिनांक २६ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.४० वाजता.यशः श्री निवासस्थान येथून वाहनाने श्री सावळाराम मंदिर, गणेशपार कडे प्रयाण. १२.०० वाजता आगमन व प्रभु श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यास उपस्थिती.

दुपारी १२.३० वा.स्थळ : श्री सावळाराम मंदिर, गणेशपार येथून दुपारी १.५० वाजता कार्यक्रमानंतर वाहनाने बीडकडे प्रयाण.दुपारी २.०० वाजता बीड शहरात आगमन व हॉटेल गोल्डन चॉईस, वार्शी रोडकडे प्रयाण. हॉटेल गोल्डन चॉईस, बार्शी रोड बीड येथे दिवंगत भाजपा नेते एजाज देशमुख यांच्या श्रध्दांजली सभेस उपस्थिती. दुपारी २.३० ते सायं ४.०० वा.बीड शहरात विविध ठिकाणी भेटी सायं ४.१५ वाजता. बालेपीर, नगर रोड, बीड येथे इर्शाद भाई (जिल्हाध्यक्ष अल्पसंख्यांक आघाडी, भाजप) यांच्या निवासस्थानी ईद निमित्त भेट.

सायं ४.४५ वाजता बीड येथून भायाळा ता. पाटोदा कडे प्रयाण. सायं ५.३० वाजता आगमन व गणेशानंद गड नारळी सप्ताह आणि नामजप यज्ञ सोहळ्यास उपस्थिती. संध्या. ७.०० वाजता भायाळा ता. पाटोदा येथून परळी वैद्यनाथ कडे प्रयाण. रात्री ९.०० वाजता यशःश्री निवासस्थान, परळी वैद्यनाथ, जि. बीड येथे आगमन व राखीव.

शुक्रवार, दिनांक २७ मार्च २०२६ सकाळी ११ ते दुपारी १.०० स्थळ : शासकीय विश्रामगृह, परळी वैजनाथ परळी मतदार संघातील (परळी व अंबाजोगाई) अभ्यांगतांच्या भेटीसाठी राखीव.

दुपारी १.१० वाजता वाहनाने नाथरा ता. परळी कडे प्रयाण.दुपारी १.३० आगमन. श्री हनुमान, विठ्ठल रुक्मिणी मंदिर, नाथरा ता. परळी व श्रीमद देवी भागवतयज्ञ ज्ञानयज्ञ सोहळयास उपस्थिती. दुपारी २.४० वाजता नाथरा येथून वाहनाने परळीकडे प्रयाण. दुपारी ३.०० वाजता यशःश्री निवासस्थान, परळी वैजनाथ, जि. बीड येथे आगमन व राखीव.

# ॲड.रवींद्र कानडे समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

**माजलगाव । प्रतिनिधी**

श्री मंगलनाथ संस्थेला २५ वर्षे पूर्ण झालेली आहे या २५ वर्षाच्या कालावधीमध्ये सभासद व नागरिक यांच्या विश्वासास पात्र राहून कार्य करत समाजातील विविध दुर्बल घटकांना आर्थिक सहाय्य करून त्यांना आत्मनिर्भर आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य संस्थेच्या वतीने करण्यात आले त्याचबरोबर केवळ व्यवसायास प्राधान्य न देता सामाजिक



बांधिलकी जपण्याचा उद्देश आखून सामाजिक,सांस्कृतिक व धार्मिक कार्यामध्ये नेहमीच अग्रेसर राहून समाज हिताची केलेल्या कार्याची दखल घेऊन लिंगायत महासंघाच्या वतीने त्यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून निश्चितच त्यांनी माजलगावचे नाव लौकिक केले आहे. सदरील कार्यक्रमात लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष श्री सुदर्शन बिरादार व प्रमुख उपस्थितीमध्ये धाराशिव जिल्ह्यातील महापौर, उपमहापौर, नगराध्यक्ष नगरसेवक,जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य उपस्थिती होते. सदरील कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील हजारोच्या संख्येने समाज बांधव या कार्यक्रमास उपस्थित होते.

# प्रा. विष्णू बोचरे यांना पीएच डी प्रदान

**वडवणी । प्रतिनिधी**



माजलगाव तालुक्यातील जदिद जवळा येथील प्रा. विष्णू शिवाजीराव बोचरे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत इंग्रजी विषयात पीएच. डी.प्रदान करण्यात आली. प्रा. विष्णू बोचरे यांनी डॉ रुपाली पालोदकर यांच्या मार्गदर्शनाखाली नॅरेटिव्हस ऑफ डायस्पोरा, नेशन अँड कल्चर: अ स्टडी ऑफ चित्रा बॅनर्जी दिवाकरूनी अँड चिमण्डा आदीची या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेऊन त्यांना विद्यापीठाने पीएच. डी प्रदान केली. यांच्या यशाबद्दल डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख डॉ मुस्तजीब खान सर, रिसर्च गाईड डॉ रुपाली पालोदकर मॅडम यांनी अभिनंदन केले.

# मुस्लिम ओबीसी चळवळीतील आधारस्तंभ निखळला - ॲड. सुभाष भाऊ राऊत

## ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर भाई अन्सारी यांना समता परिषदेची भावपूर्ण श्रद्धांजली

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मुस्लिम ओबीसी चळवळीचे जनक, मंडल योद्धा शब्बीर अन्सारी साहेब आज आपल्यात नाहीत, ही अत्यंत दुःखद आणि मनाला चटका लावणारी बातमी आहे. त्यांच्या जाण्याने मुस्लिम ओबीसी चळवळीतील आधारस्तंभ निखळला असल्याचे प्रतिपादन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी व्यक्त केले आहे.



ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर भाई अन्सारी यांना समता परिषदेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी ॲड. सुभाष राऊत बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, काही दिवसापूर्वी मुंबईत त्यांची प्रकृती ठीक नसल्याच्या वृत्तानंतर त्यांची विशेष भेट घेतली होती. ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांनी तब्बल ४५ वर्षांहून अधिक काळ सामाजिक न्यायाच्या लढाईत आपले संपूर्ण आयुष्य वाहिले. १९९० मध्ये पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी जाहीर केल्यानंतर, मुस्लिम ओबीसींना त्यांच्या घटनात्मक अधिकारांसाठी जागं करण्याचं आणि त्यांना संघटित करण्याचं मोठं कार्य शब्बीर भाईंनी केलं. त्या काळात मुस्लिम समाजात ओबीसी जागृतीची कोणतीही दिशा नव्हती, पण त्यांनीच ती दिशा दिली. राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ साहेब, गोपीनाथराव मुंडे साहेब आणि ओबीसी नेते ॲड. जनार्दन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी उभी केलेली चळवळ आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी तुमच्यासारखे युवक प्रामाणिकपणे चळवळीत काम करत आहेत, प्रस्थापितांविरुद्ध लढत आहेत, हे पाहून चांगलं वाटतं असे म्हणाले.

# जिल्हा बीड अंतर्गत जागतिक क्षयरोग दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम, जिल्हा बीड अंतर्गत दिनांक २४ मार्च २०२६ रोजी जागतिक क्षयरोग दिन साजरा करण्यात आला. बीड शहरामध्ये आज सकाळी ८.०० वाजता भव्य क्षयरोग जनजागृती रॅली काढण्यात आली. सदर रॅलीचे उद्घाटन मा. जितीन रहमान, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीशकुमार सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजय कदम,



निवासी बाह्यरुग्ण वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मीकांत तांदळे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. महेशकुमार माने, वैद्यकीय अधिकारी डॉ. सौ. मनीषा जाधव, जिल्हा क्षयरोग केंद्र बीड, तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या जनजागृती रॅलीमध्ये शासकीय व खाजगी नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, तसेच विविध शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथून सुरू होऊन शहरातील विविध मार्गांवरून मार्गक्रमण करत छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, बीड येथे समारोप करण्यात आला. समारोप प्रसंगी क्षयरोगाचे जनक रॉबर्ट कोच यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून क्षयरोग निर्मूलनाची शपथ घेण्यात आली. तसेच णपळींशींरश्र थशश्रषरीश रपव डेलळरश्र ठशषेीा ऱ्रीपवरींळेप, बीड यांच्या मार्फत १० क्षयरुग्णांना पोषण आहार किटचे वाटप करण्यात आले.

२०२६ चे घोषवाक्य: होय! आपण क्षयरोगाचा अंत करू शकतो – नेतृत्वाच्या बळावर व समुदायाच्या सहभागावर निश्चित संपवू शकतो.

Yes! We Can End TB - Led by Leadership, Powered by Community

क्षयरोगाबाबत माहिती:

क्षयरोग हा मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसिस या जीवाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार आहे. १८८२ साली रॉबर्ट कोच यांनी या जीवाणूचा शोध लावला. हा रोग मुख्यतः फुफ्फुसांना बाधित करतो, परंतु शरीरातील इतर अवयवांनाही होऊ शकतो.

कारणे व प्रसार:गर्दी व अस्वच्छ वातावरणात रोगाचा प्रसार जास्त होतो

खोकला व शिंकांमधून हवेद्वारे संक्रमण

रुग्णाच्या संपर्कातून संसर्ग होण्याची शक्यता

लक्षणे: दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला

सतत ताप येणे

छातीत दुखणे

वजन कमी होणे

जिल्हा स्थिती (२०२५):

एकूण १९९८ रुग्णांचे निदान

त्यापैकी ११८९ रुग्ण पूर्णपणे बरे

उर्वरित रुग्ण उपचाराधीन

विशेष मोहीम: प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत

२४ मार्च २०२६ ते ०१ जुलै २०२६ या कालावधीत

जिल्ह्यातील ३४४ गावांमध्ये १०० दिवसांची विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

(डॉ. माने एम. एल.)
जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र, बीड

# सांगवी पाटण येथे रमजान ईदनिमित्त सर्वधर्मसमभावाचा आदर्श

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील सांगवी पाटण येथे रमजान ईदच्या निमित्ताने सामाजिक ऐक्य व भाईचाऱ्याचा आदर्शवत संदेश देणारा कार्यक्रम उत्साहात पार पडला. येथील शिवरायांचा मुस्लिम समीर बादशहा शेख यांच्या निवासस्थानी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत ईद साजरी करण्यात आली. या प्रसंगी आ. सुरेश धस, भागवताचार्य ह.भ.प. काशिनाथ महाराज शास्त्री, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय गोल्हार, प्राचार्य एच. जी. विधाते, युवा नेते अमोल तरटे, सरपंच दत्तात्रय खोटे, माऊली भोसले, राजू भोसले, पत्रकार नितीन कांबळे,



संतोष ससाणे, ग्रामविस्तार अधिकारी, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनी एकमेकांना गळाभेट देत रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमातून सांगवी पाटण गावात जपली जाणारी भाईचारा आणि सर्वधर्मसमभावाची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

विशेष म्हणजे, सांगवी पाटण येथील ग्रामस्थ रमजान ईद, दीपावली, दसरा, यात्रा, पोळा यांसारखे सर्व सण एकत्रितपणे साजरे करतात. त्यामुळे गावात सामाजिक सलोखा आणि ऐक्याची भावना अधिक दृढ होत आहे. आपण कोणत्या जाती-धर्मात जन्माला येतो हे आपल्या हातात नसते, मात्र सर्व जाती-धर्मांचा आदर करणे हे आपल्या हातात असते, हा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला. सांगवी पाटणची ही परंपरा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, आजच्या काळात अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी. बागडे साहेब, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ४६३/२०२६**

**त्रिवेणीबाई विरूध्द निरंक**

अर्जदार – **१. त्रिवेणीबाई भ्र. नानाभाठ कोलगुडे. वय ७७ वर्ष धंदा घरकाम, रा. करचुंडी ता.जि. बीड २. राजाराम पि. नानाभाट कोलगुडे. वय – ४३ वर्षे, धंदा– शेती, रा. करचुंडी ता. जि. बीड. ३. जालिंदर पि. नानाभाऊ कोलगुडे. वय – ३९ वर्षे, धंदा– शेती, रा. करचुंडी ता.जि. बीड. ४. मनिषा भ्र. सुरेश सोन्ने. वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. सोनेवाडी ता. जि. धाराशिव** विरुध्द निरंक

मागणी– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात नानाभाऊ शिवराम कोलगुडे यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी **मयत नानाभाठ शिवराम कोलगुडे यांचा मृत्यु दिनांक १८/०१/२०२५** रोजी झाला आहे. वरील अर्जदार क्र. १ ते ४ व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत १ ते ४ यांना शासकीय व नानाभाऊ शिवराम कोलगुडे यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदार क. निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार क्र. १ ते ४ सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत नानाभाऊ शिवराम कोलगुडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २४/०३/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर **प्रकरणाची पुढील तारीख दि. २७/०४/२०२६ आहे.**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एम एस पठारे २ रे सह दिवाणी न्यायाधीश के स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ४९९/२०२६**

**गंधारी भ्र. काशीनाथ डिसले व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार : **१. गंधारी भ्र. काशीनाथ डिसले, वय–७७, वर्षे, धंदा– घरकाम, रा. वैतागवाडी, ता. जि. बीड २. रणसिंग पि. काशीनाथ डिसले, वय–४९, वर्षे, धंदा– शेती, रा.वैतागवाडी, ता. जि. बीड. ३. मालन भ्र. संजय कुमटकर, वय–४५, वर्षे, धंदा– घरकाम, रा.तांदळवाडी घाट, ता. जि. बीड. ४. शालन भ्र. लहु तुपे, वय – ४६, वर्षे, धंदा– घरकाम, रा.पाटोदा (बेलखंडी), ता. जि. बीड** विरुध्द निरंक

(अर्जदार हे भारतीय आहेत)

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत काशिनाथ दाजिबा डिसले यांचे वारसअसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत काशिनाथ दाजिबा डिसले यांचा मृत्यु दिनांक ०३.०६.२०२४ रोजी राहत्या घरी मौजे वैतागवाडी ता. जि. बीड** येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क २ हा मयताचा मुलगा असून अर्जदार के ३ व४ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदर अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत काशिनाथ दाजिबा डिसले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०४ मे २०२६**

**(ॲड. एस. डी. घोडके)**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर बीड**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार दि. २६ मार्च २०२६ ●

## थोडक्यात...

### मौजे तांदळवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेचे पारायण




**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथे १९/०३/२०२६ रोजी अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात झाली असून गेल्या २६ वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह भागवत पारायण यांची परंपरा अखंड चालू आहे ही अखंड पारायण सेवा चालूच राहणार असून धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथे ज्ञानेश्वरी पारायण काकड आरती भजन कीर्तन सप्ताहात चालू असून तालुक्यातील भाविक भक्तांनी या कथेचा व कीर्तनाचा लाभ घ्यावा या सप्ताहाची सांगता गुरुवार रोजी होणार असून तालुक्यातील भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे समस्त गावकरी मंडळी तांदळवाडी यांच्या वतीने करण्यात आले असून भागवताचार्य ह भ प ज्ञानेश्वरी सोळुंके यांची असून तबलावादक माऊली महाराज राजूरकर संत वादक गोविंद महाराज पार्टी पॅड वादक गणेश सुरनरकर यांच्या गोड वाणीतून मोजे चांदवाडी परी गावातील व परिसरातील भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले आहेत या सप्ताहात महाप्रसादाचा लाभ गुरुवार रोजी व सांगता होईल अशी आव्हान गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे

### रामनवमी निमित्त निघणाऱ्या मोटार सायकल रॅली व शोभयात्रेस उस्फुर्तपणे सहभागी व्हा: परशुराम गुरखुदे




**बीड । प्रतिनिधी**


२६,मार्च २०२६, गुरुवार सकाळी ठीक ०९ : ०० वाजता श्री. गणेश मंदिर, बार्शी नाका, बीड येथून मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच प्रभु श्रीरामांची भव्य शोभायात्रा दुपारी ठीक ४ वाजता श्री. क्षेत्र कंकालेश्वर मंदीर येथून सुरू होवून शिवतीर्थ येथे प्रभू श्रीरामाची आरती करण्यात येणार आहे. या निमित्ताने बीड शहरात आनंदाचे वातावरण तयार झालेले आहे, बीड शहर व तालुक्यातील सर्व राम भक्तांनी मोठ्या संख्येनी या प्रभु श्रीराम जन्मोत्सव सोहळा उत्साहात सहभागी होवुन या कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन द्वारकाधीश मित्र मंडळाचे अध्यक्ष परशुराम गुरखूदे यांनी केले आहे.

### दिनांक २७ व २८ मार्च रोजी बीड येथे दोन दिवशीय ग्रंथोत्सवाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड जिल्हा ग्रंथालय संघ व र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई येथे दिनांक २७ व २८ मार्च २०२६ रोजी ग्रंथोत्सव २०२५ चे आयोजन र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड येथे आयोजित केले आहे. या दोन दिवसीय कार्यक्रमात भव्य ग्रंथ प्रदर्शन, विक्री व साहित्यीक मेळावा आयोजित केला आहे. या कार्यक्रमात उध्दघाटन सोहळा, –ख आणि साहित्यः –ख चे लेखन, भाषांतर आणि वाचन संस्कृतीवर होणारा परिनाम या विषयावर व्याख्यान, सार्वजनिक ग्रंथालयांची स्थिती काल, आज आणि उद्या यावर परिसंवाद, कवि संम्मेलन व कथाकथन असे विविध कार्यक्रम दोन दिवस आयोजित केले आहे. या कार्यक्रमात बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व प्रशासकीय सेवेतील अधिकारी यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असणार आहे तसेच जिल्ह्यातील साहित्यीकांचे कथाकथन, कवीतांची मेजवानी राहणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथोत्सव समितीने केले आहे.

### कु.मनवा वाव्हळचे नवोदय परीक्षेत भरारी



**वडवणी । प्रतिनिधी**

खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथील विद्यार्थिनी तसेच वडवणी येथील ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांची नात व सहशिक्षक ज्ञानेश्वर सुभाषराव वाव्हळ यांची मुलगी कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने नुकत्याच जाहीर झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश पूर्व परीक्षेत दैदिप्यमान असे यश मिळवत संपूर्ण जिल्ह्यातून या परीक्षेत १७ व्या रँकनूसार व ९७ टक्के गुणांसह नवोदय विद्यालयातील आपल्या प्रवेशासाठी ती पात्र ठरली आहे. तिच्या या यशाबध्दल तिचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये अतिशय प्रतिष्ठित अशा समजल्या जाणाऱ्या व केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली असलेले बीड जिल्ह्यातील एकमेव असलेल्या नवोदय विद्यालय गढी या विद्यालयामध्ये इयत्ता सहावी प्रवेश पूर्व परीक्षा डिसेंबर २०२५ मध्ये संपन्न झाली होती. या परीक्षेचा निकाल मंगळवारी ऑनलाईन पध्दतीने जाहीर झाला. या परीक्षेत माजलगांव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालय याठिकाणी इयत्ता पाचवी वर्गात शिक्षण घेत असलेली कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने आपल्या गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली कुशाग्र बुध्दीमत्तेच्या बळावर परीक्षेत दैदिप्यमान असे यश मिळवत संपूर्ण जिल्ह्यातून या परिक्षेत १७ व्या रँकनूसार व ९७ टक्के गुणांसह नवोदय विद्यालयातील आपल्या प्रवेशासाठी ती पात्र ठरली आहे.

## गेवराईच्या सांस्कृतिक परंपरेला...

# आर्ट ऑफ फन अकॅडमीने नवसंजीवनी दिली: गीताभाभी बाळराजे दादा पवार

### आर्ट ऑफ फन अकॅडमीचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

गेवराईच्या सांस्कृतिक चळवळीला नवे बळ देणाऱ्या आर्ट ऑफ फन अकॅडमी कौतुकास पात्र ठरत आहे. आर्ट फन अकॅडमीची विद्यार्थ्यांनी केवळ गेवराईच नव्हे तर बीड, नाशिक पुणे आणि मुंबई येथे आपला कलाविष्कार सादर करून घवघवीत यश मिळवले आहे. गेवराईमध्ये नव कलाकरांची पिढी घडवण्याचा वसा हाती घेऊन आर्ट ऑफ फन अकॅडमीने गेवराईच्या सांस्कृतिक परंपरेला नवसंजीवनी दिली आहे असे मत गेवराई नगर पालिका अध्यक्षा सौ गीताभाभी बाळराजे दादा पवार यांनी व्यक्त केले. सन २०२५-२६ या वर्षातील नृत्य व नाट्य विभागाचा बक्षीस वितरण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्याचे उद्घाटन गेवराईच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा आदरणीय सौ. गीताभाभी बाळराजे दादा पवार यांच्या हस्ते करण्यात आले. गेल्या पाच वर्षांपासून गेवराईच्या थंडावलेल्या सांस्कृतिक परंपरेला नवसंजीवनी देत अकॅडमीने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार श्री. सुभाष सुतार यांच्या हस्तेही विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या वेळी बोलताना नगराध्यक्षा सौ. पवार यांनी सांगितले की, कलेला वय नसते, त्यामुळे आर्ट ऑफ फन अकॅडमीच्या प्रत्येक उपक्रमात पवार परिवार सदैव पाठीशी राहील. तर ज्येष्ठ पत्रकार श्री. सुतार यांनी कला मानवाला समृद्ध करते आणि अकॅडमीचा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे मत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी मुस्कान वादवाणी मॅडम यांनीही अकॅडमीमुळे मुलांमध्ये सकारात्मक बदल झाल्याचे सांगितले. या सोहळ्यात चौथे विश्व मराठी संमेलन (नाशिक), अतुल परचुरे बाल कला करंडक (पुणे), राज्य बालनाट्य स्पर्धा (बीड), जल्लोष लोककलेचा (मुंबई), इतिहास महाराष्ट्राचा (मुंबई) आणि रंगोत्सव (गेवराई) या विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. ज्ञानदा



जोशी, अथश्री देशपांडे, आद्या बोर्डे, आर्या वावरे, मन्नत वादवाणी, प्रांजल टाक, पल्लवी उघडे, काव्या मुंदडा, अन्वी मुंदडा, अवनी खेत्रे, केतकी कवडे, कृष्णली कवडे, स्वरा झेंडेकर, विदिशा जाधव, ऋताक्षी मगर, तन्मयी घाडगे, आरोही वाघमारे, वेदांत दहिवाळ, श्लोक मानधने, वेदांत कोकाटे, श्लोक गायकवाड, अजित सदाफुले, आयुष कांडेकर आणि सिद्धांत निकम या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाने अकॅडमीचे नाव उंचावले. कार्यक्रमाला ज्येष्ठ कलावंत तथा बालरंगभूमी परिषदेचे जिल्हा समन्वयक शाहीर विलास बापू सोनवणे, इको इम्पॅक्ट फाउंडेशनचे संस्थापक रोहन पंडित, पालक प्रतिनिधी निकम मॅडम तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मनिषा मानधने, प्रस्तावना रोहित पुराणिक यांनी मांडली, तर आभार प्रदर्शन राम जोशी सर यांनी केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अकॅडमीचे संचालक शिवकुमार सोनवणे, रोहित पुराणिक व विवेक शर्मा यांनी विशेष परिश्रम घेतले. या भव्य सोहळ्यामुळे गेवराईच्या सांस्कृतिक क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना नवा रंगमंच मिळाला आहे.

# पोलीस पाटील पदी निवड झाल्याबद्दल चि. विशाल प्रकाश इंदुरे यांचा सत्कार


**बीड । प्रतिनिधी**

दगडी शहाजनपुर गावच्या पोलीस पाटील पदी कुणबी-मराठा मधून चि. विशाल प्रकाश इंदुरे यांची निवड झाल्याबद्दल दगडीशहाजनपूर ग्रामस्थ, मित्रपरिवार व नातेवाईकाच्या वतीने भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या यशाबद्दल चि.विशाल इंदुरे यांचे श्री.क्षेत्र नारायण गडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. महंत संभाजी महाराज यांनी स्वागत करून शुभ आशीर्वाद दिले, याप्रसंगी दिलीप गोरे (विश्वस्त श्री.क्षेत्र नारायणगड), ॲड. श्री. महादेवराव तुपे (विश्वस्त श्री.क्षेत्र नारायणगड) श्री. जे.



पी. शेळके सर (विश्वस्त श्री. क्षेत्र नारायणगड), गावच्या प्रथम नागरीक सौ.अनिता अण्णासाहेब धुताडमल, तांदळवाडी गावचे विद्यमान सरपंच श्री. श्रीराम सांगुळे,श्री. शांतीलाल गोरे (मा. पोलीस उपनिरीक्षक बीड), श्री. दत्तात्रय नवले (मा. उपसरपंच), श्री. बाबासाहेब सांगुळे (मा. चेअरमन), श्रीमंत इंदुरे (मा. सरपंच), श्री.भारत सांगुळे (व्हॉइस चेअरमन), श्री.धर्मराज गोरे,श्री.आबासाहेब सांगुळे, श्री. बबन गोरे, श्री.अमोल सांगुळे, श्री. विक्रम गोरे, श्री.रमेश गोरे, श्री.अशोक गोरे, श्री. रोहिदास गोरे, श्री.मारुती गोरे, श्री. गणेश घोडके, श्री. अनुरथ सांगुळे, श्री. देवानंद गोरे, श्री. प्रभाकर गवंडे, श्री.सिताराम घोरड, श्री. दिलीप इंदूरे, श्री. राजाराम इंदुरे, श्री.विष्णू इंदुरे, श्री.महादेव इंदुरे सर्वांनी उपस्थित राहून या उज्वल यशाबद्दल कौतुकाचा वर्षाव केला. दगडी शहाजनपुर गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी, प्रशासन आणि गाव यामधील दुवा आणि गावाचा शांतीदूत म्हणून ाकाम करण्याची जबाबदारी चि.विशाल इंदुरे यांच्यावर भविष्यात आहे.

### बीडला रामकथा, रथयात्रेसह रामनवमीचे आयोजन



**बीड । प्रतिनिध**

येथील स्वराज्यनगर भागातील मराठवाड्यात एकमेव असलेल्या जगन्नाथ मंदिराच्या वर्धानदिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

दि. १९ मार्चपासून दुपारी ३ ते ६ या वेळेत रामकथा प्रारंभ होणार असून दि.२५ मार्च रोजी कथेची सांगता होणार आहे. याच दिवशी कथा समाप्ती नंतर सायंकाळी ४ वाजता भव्य जगन्नाथ रथयत्रा काढण्यात येणार आहे. या रथयात्रेत मोाठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले असून दि.२६ मार्च गुरुवार रोजी म्उत्साहात रामनवमी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष गोलोक वृंदावन दास महाराज व मंदीर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### प्रभू श्रीराम नवमी निमित्त निघणाऱ्या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हा : नगरसेवक मंगेश धोंगडे

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये आपण सर्व प्रभू श्रीराम नवमी मोठ्या उत्साहात साजरी करतोत. तसेच यावर्षीही त्याच उत्साहाने त्याच जल्लोषाने साजरी करणार आहोत, गुरुवार दिनांक २६/०३/२०२६ रोजी श्री गणेश मंदिर बार्शी नाका येथून सकाळी ०९:०० वाजता मोटरसायकल रॅली व दुपारी ०४:०० वाजता श्री कंकालेश्वर मंदिर पेठ बीड इथून भव्यदिव्य शोभायात्रा निघणार आहे. तसेच शोभायात्रे मध्ये आकर्षक देखावे देखील सादर करण्यात येणार आहेत. तरी सर्व



हिंदू बांधवांनी या मोटरसायकल रॅली व शोभायात्रेस मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक मंगेश अंबादासराव धोंगडे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

### लेखिका बेबीसरोज अंबिलवादे यांचा ग्रामीण सोनार संघटनेने केला सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

लेखिका व कवयित्री बेबीसरोज अंबिलवादे यांचा ग्रामीण सोनार संघटनेच्या वतीने शॉल,श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. नोकरी करत असतांना वृत्तपत्रात रेंगळणा-या हाताने मला नकळत लिहायला शिकविले अन् पाहता पाहता माझी पाच पुस्तके प्रकाशित झाली या



पुस्तकांना विविध पुरस्कार मिळाले पण माझ्या समाजाकडून माझ्या साहित्याची दखल घेऊन माझा हा सन्मान केला तो माझ्यासाठी भाग्याचा क्षण ठरला. टाकळीभान येथील ग्रामीण सोनार संघटनेचे अध्यक्ष मधुकर मैड यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून गौरव करण्यात आला.

# मावलाई श्री राज्यस्तरीय समाजसेवा पुरस्कार डॉ. गणेश ढवळेंना जाहीर

**बीड । प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील मावलाई युवक क्रीडा मंडळ व व्यायाम शाळा ब-हाणपुर यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या १७ वर्षांपासून मावलाई देवी यात्रेनिमित्त पत्रकारिता, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना मावलाई श्री राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यावर्षी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांना मावलाई श्री समाजसेवा पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील मूलभूत सुविधा, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न, वृक्षारोपण व संवर्धन तसेच पर्यावरण संरक्षण यांसारख्या विविध सामाजिक विषयांवर सातत्याने अनोख्या आंदोलनांच्या माध्यमातून शासन दरबारी पाठपुरावा केल्याबद्दल त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा ब-हाणपुर येथे दि. ०३ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला आहे. यावेळी शशिकांत शिंगारे यांच्या हस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमास प्रमोद कुलकर्णी, दिनेश लिंबेकर, सुशील देशमुख, अविनाश वाघिरकर, धनंजय बजगुडे तसेच सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड आर. एम. मोटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच पाडळशिंगी रितेश साबळे, मंडळ अध्यक्ष विष्णू यादव, सचिव भागवत वराट, पांडुरंग पवार, संतोष वराट यांनी केले आहे. हा राज्यस्तरीय सन्मान जाहीर झाल्याबद्दल डॉ. गणेश ढवळे दैनिक मराठावाडा पत्र च्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.



*बीड : बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा (Bar Council of Maharashtra and Goa) ची निवडणूक संपूर्ण महाराष्ट्र आणि गोव्यात पार पडली. बीड येथे मतदान करताना आडवोकेट गोविंदा शिराळे, ॲड सोनम गोविंद शिराळे मतदान करताना छायाचित्रात दिसत आहेत.*